## मेहकर येथील दिवाणी न्यायाधीश वरिष्ठ स्तर यांचे न्यायालयात

(पिठासीन अधिकारी अ.अ. शेख )

दत्तात्रय उर्फ दत्तू श्रीराम मुरकुट व इतर .. वादी

विरुध्द

राजेंद्र शिवाजी मुरकुट व इतर .. प्रतिवादी

## तातपुरता मनाई हुकूम मिळण्याचा अर्ज नि.क्र.०५ वरील आदेश

१. प्रस्तुतचा अर्ज वादींनी दिवाणी प्रक्रिया संहिता आदेश ३९ नियम १ व २ अनुसार दाखल करुन तहसीलदार सिंदखेडराजा यांनी रा.प्र.क्र.एम.सी.ए.–५/डोरव्ही/५०/२०२०–२१ मध्ये दिनांक ०६.०६.२०२२ रोजी दिलेल्या निकालाची अंमलबजावणी करणेकामी वादी यांच्या मालकीच्या जमिनीतून नवीन रस्ता तयार करु नये, असा तात्पुरता मनाई आदेश या दाव्याचा निकाल होईपावेतो देण्यात यावा अशी विनंती केली आहे.

२. प्रस्तुत अर्जास प्रतिवादी क्र.१ ते ३ यांनी त्यांचे लेखी म्हणणे नि.क्र.२३ अनुसार दाखल करुन अर्ज मंजूर करण्यास विरोध दर्शवला आहे. प्रतिवादी क्र.४ व ५ यांनी प्रस्तुत अर्जास त्यांचे म्हणणे दाखल केले नाही.

३. उभय पक्षांचे कथन व दाखल कागदपत्रांवरुन माझे विचारार्थ खालील मुद्दे उपस्थित झालेले असून, त्यांचे निष्कर्ष मी पुढीलप्रमाणे नोंदवित आहे.

| अ.क्र. | मुद्दे | निष्कर्ष |
|---|---|---|
| १) | वादींनी प्रस्तुत अर्जासंदर्भात प्रथमदर्शनी पुरावा सादर केला आहे काय ? | ..नकारार्थी |
| २) | न्यायाचा समतोल वादींच्या बाजूने आहे काय ? | ..नकारार्थी |
| ३) | अर्ज नामंजूर झाल्यास वादींचे अपरिमीत नुकसान होणार आहे काय ? | ..नकारार्थी |
| ४) | कोणता आदेश ? | ..अर्ज नामंजूर करण्यात आला. |

## का र ण मि मां सा

४. वादी क्र. १ याने प्रस्तुत अर्जातील कथनांच्या पृष्ठयर्थ स्वतःचे शपथपत्र दाखल करुन खालीलप्रमाणे कागदपत्र दाखल केलेले आहेत–

०१ वादग्रस्त रस्ता खुला होवून मिळण्याकरिता प्रतिवादींनी दिनांक १९.०७.२०२१ रोजी मामलतदार कोर्टात दाखल केलेल्या अर्जाची प्रत,

०२ मामलतदार कोर्टात प्रस्तुत दाव्यातील वादींनी दाखल केलेल्या लेखी जबाबाची तसेच अंतिम लेखी युक्तीवादाची प्रत,

०३ मामलतदार कोर्टाने वादग्रस्त जागेचे केलेले स्थळ निरीक्षणाची प्रत,

०४ मामलतदार कोर्टाने रा.प्र.क्र.एम.सी.ए.–५/ डोरव्ही/५०/२०२०–२१ मध्ये दिनांक ०६.०६.२०२२ रोजी दिलेल्या निकालाची प्रत,

०५ मामलतदार कोर्टाने दिलेल्या निकालाविरुध्द प्रस्तुत दाव्यातील वादींनी उपविभागीय अधिकारी सिंदखेडराजा यांच्या न्यायालयात दाखल केलेल्या रिव्हीजनची प्रत,

०६ प्रस्तुत दाव्यातील वादींनी रिव्हीजन मध्ये दाखल केलेल्या लेखी युक्तीवादाची प्रत,

०७ उपविभागीय अधिकारी यांनी रिव्हीजन क्रमांक रा.प्र.क्र.एम.सी.ए.–५/ डोरव्ही/३१/२०२१–२२ मध्ये दिनांक ०८.०५.२०२३ रोजी दिलेल्या निकालाची प्रत,

०८ दिनांक २३.०३.१९९८ रोजीचे वादी क्र.१ च्या नावे असलेले खरेदी दस्ताची प्रत,

५. प्रतिवादींनी त्यांच्या कथनाच्या पृष्ठयर्थ खालीलप्रमाणे कागदपत्र दाखल केले आहेत.

०१ रा.प्र.क्र.एम.सी.ए.–५/ डोरव्ही/५०/२०२०–२१ मधील उभयपक्ष व त्यांच्या साक्षीदारांनी नोंदविलेल्या पुराव्याच्या प्रती,

०२ वादग्रस्त रस्त्याचे फोटो

६. वादी व प्रतिवादी यांच्या विधीज्ञांचा युक्तीवाद ऐकण्यात आला.

**<u>मुद्दा क्र.१ ते ४ करीताः</u>–**

७. सर्व मुद्दे एकमेकांशी निगडीत असल्यामुळे त्याची चर्चा एकत्रीत करण्यात येत आहे. उभयपक्षांच्या लेखी कथनावरुन असे दिसून येते की, मौजे डोरव्ही तालुका सिंदखेडराजा येथील गटक्रमांक १५१,१५२,१५३ व १५४ मध्ये वादी यांच्या नावे शेतजमिनी असून गटक्रमांक ८४ व ८६ मध्ये प्रतिवादी क्र.१ ते ३ यांच्या नावे शेतजमिनी आहेत. वादींच्या कथनानुसार प्रतिवादी क्र. १ ते ३ यांना त्यांची जमीन गटक्रमांक ८४ व ८६ मध्ये जाणे येणेकरिता बैलगाडी रस्ता मौजे डोरव्ही ते मलकापूर पांग्रा या डांबरी रस्त्याने येवून भगवान बाबुराव मुरकुट यांच्या गटक्रमांक १५६ च्या पूर्वेकडील उत्तर–दक्षिण चालीचा पूर्वापार रस्ता अस्तित्वात असून सदर रस्त्याचा वापर ते करीत आहे. प्रतिवादी क्र.१ ते ३ यांच्या कथनानुसार मौजे डोरव्ही येथील गटक्रमांक १५५,१५४,१५३,१५२,१५१ व ८६ मधील जमिनीच्या पूर्व बाजूने उत्तर–दक्षिण चालीचा पूर्वापार रस्ता अस्तित्वात होता व आहे. सदर रस्त्यावर वादींनी केलेला अडथळा काढण्याबाबत मामलतदार कोर्टाने तसे आदेश पारित केलेले आहेत.

८. वादींनी वरीलप्रमाणे सुचविलेल्या रस्त्याबाबतचे कथन पहिल्यांदाच

वादपत्रात व प्रस्तुत अर्जात केल्याचे दिसून येत आहे. याउलट, प्रस्तुत दाव्यातील वादींनी रा.प्र.क्र.एम.सी.ए.–५/ डोरव्ही/५०/२०२०–२१ मध्ये दाखल केलेल्या लेखी जबाब, अंतिम लेखी युक्तीवाद तसेच उपविभागीय अधिकारी सिंदखेडराजा यांच्या न्यायालयात दाखल केलेल्या रिव्हीजन / अपील व लेखी युक्तीवादामध्ये "अर्जदार राजेंद्र शिवाजी मुरकुट व इतर यांना त्यांची जमीन गटक्रमांक ८४ व ८६ मध्ये जाणे येणे करिता मौजे डोरव्ही ते मलकापूर पांग्रा या डांबरी रस्त्याने येवून भगवानराव बापुराव मुरकुट यांच्या गटक्रमांक १५६ च्या पश्चिम धु–याने उत्तर–दक्षिण चालीचा बैलगाडी रस्ता उपलब्ध होता व आहे आणि सदर रस्त्याचा ते वापर करीत आहेत. " असा उल्लेख केलेला आहे. एकंदरीत वादींनी असे मान्य केले आहे की, त्यांच्या जमिनीच्या पूर्व बाजूने उत्तर–दक्षिण चालीचा वहिवाटी रस्ता प्रतिवादी क्र.१ ते ३ यांना उपलब्ध आहे. मामलतदार कोर्टाने केलेल्या स्थळ निरीक्षण अहवालावरुन प्रथमदर्शनी असे दिसून येते की, वादींनी त्यांच्या जमिनीच्या पूर्व बाजूस काटया लावून प्रतिवादींची वहिवाट बंद केलेली होती.

९. प्रस्तुत दाव्यातील प्रतिवादींनी मामलतदार कोर्ट अॅक्ट चे कलम ५ अन्वये दाखल केलेला अर्ज सहा महिन्याच्या मुदतीत दाखल करण्यात आलेला नव्हता. तसेच त्या प्रकरणात आवश्यक असलेल्या पक्षकारांना समाविष्ट करण्यात आलेले नव्हते, असे मुद्दे वादींच्या विधीज्ञांनी उपस्थित केलेले आहेत. मामलतदार कोर्टाने दिनांक ०६.०६.२०२२ रोजी दिलेल्या निकालातील निष्कर्षावरुन प्रथमदर्शनी असे दिसून येते की, प्रस्तुत दाव्यातील प्रतिवादींनी मामलतदार कोर्ट अॅक्टचे कलम ५ अनुसार दाखल केलेला अर्ज दावा दाखल करण्यास घडलेल्या तारखेपासून सहा महिन्याच्या आत दाखल केलेला आहे. याउपरही, वादींच्या वतीने उपस्थित करण्यात

आलेले मुद्दे हे पुराव्याचा भाग आहे. मामलतदार कोर्टाने दिलेला निकाल, उभयपक्षांचे लेखी कथन, स्थळ निरीक्षण अहवालाच्या आधारे दिलेला असल्याचे प्रथमदर्शनी दिसून येत आहे. सदर निकालास स्थगिती देण्याचे कोणतेही संयुक्तीक कारण न्यायालयास दिसून येत नाही. वादींनी प्रस्तुत अर्जात सुचविलेल्या वहिवाटी रस्त्याबाबत कोणताही प्रथमदर्शनी पुरावा न्यायालयासमोर आणलेला नाही. याउलट, वादींच्या जमिनीच्या पूर्व बाजूने उत्तर–दक्षिण चालीचा प्रतिवादी क्र.१ ते ३ यांचा वहिवाटी रस्ता असल्याचे प्रथमदर्शनी दिसून येत आहे. प्रस्तुत अर्ज मंजूर होणे संदर्भात वादी पक्षाने कोणताही सकृतदर्शनी पुरावा न्यायालयात सादर केलेला नाही. न्यायालयात दाखल कागदपत्रावरुन न्यायाचा समतोल प्रतिवादी यांच्या बाजूने असल्याचे स्पष्ट होत आहे. सबब, प्रस्तुतचा अर्ज वादींच्या मागणीनुसार मंजूर होण्यास पात्र नाही. त्या अनुषंगाने मी मुद्दा क्र.१ ते ३ चे निष्कर्ष नकारार्थी नोंदवून, मुद्दा क्र.४ करीताचे निष्कर्षार्थ खालीलप्रमाणे आदेश पारीत करीत आहे.

## आ दे श

१. प्रस्तुतचा अर्ज नि.क्र.०५ नामंजूर करण्यात आला.

२. खर्चाबाबत हुकूम नाही.

३. उभयपक्षातील वाद वहिवाटी रस्त्या संदर्भात असल्यामुळे दावा आजपासून चार महिन्याच्या आत निकाली काढणेकामी उभयपक्षांनी आपापला पुरावा नेमलेल्या तारखेस सादर करावा.

SHAIKH ABDULKARIM A

Digitally signed by SHAIKH ABDULKARIM A
Date: 2023.09.11 11:27:08 +0530

(अ.अ.शेख)

दिनांक:–०८/०९/२०२३.

दिवाणी न्यायाधीश व.स्तर,
मेहकर.

I A.N.Vyawhare, Stenographer (Grade II ) affirm that, contents of the PDF files are same words for words as per original.

Date of Judgment / order : 08.09.2023
Date of Uploading : 11.09.2023